# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
# जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर

फोन नंबर ०७१२/२५६२६६८
ई-मेल rdc_nagpur@rediffmail.com

क्र.जिनिक/म.स./नै.आ.व्य/कावि.२५५/२०२५
दिनांक:- ०८/०७/२०२५.

वाचा:- १. आपती व्यवस्थापन अधिनियम २००५ कलम कलम २५,३०(२) (३) (५) व (१८)
२. शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण२०१९/प्र.क्र.१९९/एसडी.२, दि. ०२/०८/२०१९
३. भारतीय हवामान विभाग, यांची दिनांक ०८/०७/२०२५ रोजीची हवामान विषयक पूर्वसूचना.

**आदेश**

**ज्याअर्थी,** भारतीय हवामान विभागाने दिलेल्या पुर्वसुचनेनुसार नागपुर जिल्ह्यात दिनांक ०८/०७/२०२५ रोजी ऑरेंज अलर्ट दिनांक ०९/०७/२०२५ रोजी येलो अलर्ट देण्यात आलेला आहे. नागपुर जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आलेली आहे. नागपुर जिल्ह्यातील अनेक भागात मुसळधार पाऊस झालेला असून भारतीय हवामान खात्याने वर्तवलेल्या हवामान अंदाजानुसार जर अतिमुसळधार पाऊस पडल्यास दिनांक ०९ जुलै, २०२५ रोजी नागपुर जिल्ह्यात अनेक भागात अचानक पूरसदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नागपुर जिल्हयातील अनेक तालुक्यातील रस्ते मार्ग हे पुराच्या पाण्याने प्रभावीत झाले असून नागपुर जिल्ह्यात कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये तसेच अतिवृष्टीमुळे आपतकालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्याचा परिणाम शालेय विद्यार्थ्यांवर होऊ नये या करिता जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी, शाळा व महाविद्यालये मधिल विद्यार्थांना उद्या दिनांक ०९/०७/२०२५ रोजी सुट्टी असणे आवश्यक आहे.

**आणि ज्याअर्थी,** आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हाधिकारी हे आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत व संदर्भ क्र. २ कडील शासन परिपत्रकानुसार शाळांना सुट्टी जाहिर करण्याचे अधिकार संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी यांना देण्यात आलेले आहेत.

**त्याअर्थी** मी, **डॉ. विपिन इटणकर, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपुर मला आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५** व संदर्भ क्र. २ शासन परिपत्रक नुसार प्राप्त अधिकारान्वये **नागपुर जिल्ह्यातील सर्व सरकारी व खाजगी अंगणवाडी, प्राथमिक, माध्यमिक शाळा व महाविद्यालये व कोचिंग क्लासेस यांना विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेतेच्या दृष्टीकोनातून संपूर्ण नागपुर जिल्हा सीमा क्षेत्रामध्ये (नागपुर महानगरपालिका क्षेत्रा सह) दिनांक ०९ जुलै, २०२५, बुधवार रोजी सुट्टी जाहीर करीत आहे.**

(डॉ. विपिन),
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नागपुर**

प्रत:-

१. मा. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

२. मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.
३. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस सविनय सादर.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
५. पोलीस अधिक्षक, नागपूर ग्रामीण यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
६. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपूर विद्यापीठ, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
७. उपविभागीय अधिकारी, (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
८. तहसिलदार, (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
९. खंडविकास अधिकारी, (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
१०. मुख्याधिकारी, नगर परिषद (सर्व) / नगर पंचायत (सर्व) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
११. शिक्षणाधिकारी, प्राथमिक (सर्व) / माध्यमिक (सर्व), जिल्हा परिषद, नागपूर यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस अग्रेषित.
१२. जिल्हा माहिती अधिकारी, नागपूर यांना प्रसिध्दीसाठी अग्रेषित.